# मुलुंड पोलीस ठाणे

## 'प्रपत्र अ'

| अ. क्र. | पोलीस ठाणे/ पोलीस शाखा | गु.र.क्र. व कलम | बळीत व्यक्तीचे नांव/ तपशील | गुन्हयाची थोडक्यात हकिगत | कोणी उघडकीस आणला (पो. ठाणेयेथील तपासी पथकाचा तपशिल) | तपासाचे वैशिष्टय (संबंधीत पथकाचे उत्कृष्ठ कौशल्य कशा प्रकारे दिसून आले) | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ | ०७ | ०८ |
| ०१ | **मुलुंड पोलीस ठाणे** | गु.र.क्र. ६४५/२०२० कलम ३०२,१२०(ब) भादवि | **मारुती लक्ष्मण गवळी वय—७० वर्षे पत्ता—** | मुलुंड पोलीस ठाणे हद्दीत राहणारे**मारुती लक्ष्मण गवळी वय—७०**हे वर्षीय इसम दिनांक ०२/१०/२०२० रोजी २०:३०वा. झोपण्यासाठी नेहमीच्या ठिकाणी सिल्वर ग्लास दुकानासमोर, शॉप नं १७, हंसा व्हिला, वालजी लदद्‌ा रोड, मुलुंड (प), मुंबई ८० गेले होते. सकाळी उशिरा पर्यंत ते निवासस्थांनी परत न आल्याने त्यांच्या मुलाने ते झोपत असलेल्या ठिकाणी जावून पहाणी केली असता त्यांचा कोणीतरी अज्ञात इसमाने निर्घृणपणे खुन केला असल्याचे दिसले. त्यावर त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुलुंड पोलीस ठाणे, | **पोनि वारके,** | • सदर तक्रारीची तात्काळ दखल घेत मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, मुंबई व मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ७, मुंबई यांनी वेगवेगळी पथके तयार करून तपास सुरू केला.<br>• सदर गुन्हयाचा कसोशीने तपास करून देखील मयत इसमाच्या खुनामागे असलेला हेतू स्पष्ट होत नव्हता.<br>• तपास पथकाने परिसरातील रहाणाऱ्या लोकांकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासातून सदर परिसरात रहाणारे दोन इसम त्यांचे वडिलांच्या मृत्युमुळे व्यथीत झाले आहेत. त्यांचे वडिलांच्या मृत्युवेळी त्यांचे समाजातील लोकांनी दुखवटा व्यक्त केला नाही तसेच त्यांच्या अंत्यविधीत सहभागी झाले नाहीत याचा त्यांना राग होता. त्याचबरोबर त्यांचे वडिलांवर समाजातील व परिसरातील लोकांनी करणी केल्यामुळेच | उत्कृष्ट तपास |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | गुन्हा रजिस्टर क्रमांक ६४५/२० कलम ३०२,१२० (ब) भादवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. | | त्यांचा मृत्यु झाल्याचा त्यांचा समज होता. त्यामुळे समाजातील कोणातरी व्यक्तीचा मृत्यु झाल्याशिवाय वडिलांच्या आत्म्यास शांती मिळणार नाही अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी समाजातील व परिसरातील तीन लोकांची हत्या करण्यासाठी निवड केली.<br>• सदर तिन इसमांपैकी नमुद गुन्हयातील बळीत इसम हे स्वत:च्या घराबाहेर निर्जन ठिकाणी रात्री झोपावयास असल्याने त्यांना जीवे ठार मारणे शक्य होते.<br>• त्यामुळे त्यांनी घाटकोपर व देवनार परिसरातील एकूण ४ इसमांना ७० हजार रूपयांची सुपारी देवून जीवे ठार मारले असल्याचे नि:ष्पन्न झाले आहे.<br>• मुलूंड पोलीस ठाणेच्या तपास पथकाने अथक प्रयत्न करून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे तसेच मानवी कौशल्याचा अचुक वापर करून गुन्हयातील मुख्य सुत्रधार असलेले दोन सख्खे भाऊ व प्रत्यक्ष गुन्हा करणारे तीन आरोपींसह एकूण ६ आरोपींना ताब्यात घेवून सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. | |